**महाराष्ट्रातील शेतक-यांचे उत्पन्न वाढविण्याकरीता राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत बांबू टिश्यू कल्चर रोपे लागवड योजना**

**योजनेचे स्वरुप :-** बांबू शेती योजनेचा उद्देश जलद वाढणा-या व उच्च प्रजातीच्या बांबू प्रजातीची शेती/ खाजगी जमीनीवर लागवड करुन राज्यात बांबू शेतीचा विकास करणे होय. या योजनेमुळे राज्यात बांबूच्या उत्पादनात वाढ करण्या सोबतच शेतक-यांना अतिरिक्त उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध होईल. तसेच स्थानीक बांबू कारागीरांना तसेच बांबूवर आधारीत उद्योगांना आवश्यक कच्चा माल उपलब्ध होईल.

1. या योजनेतंर्गत भारत सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुषंगाने खालील प्रमाणे रोपवन कार्यक्रम ठरविण्यात येत आहे.
   i) खाजगी शेती जमीनीवर उच्च प्रजातिच्या टिश्यू कल्चर रोपांची लागवड करण्याकरीता प्रति रोप **रु. 240/-** या दराने खर्च मंजूर करण्यात आलेला आहे. त्यापैकी 50 टक्के रक्कम अनुदान (Subsidy) रुपाने शासनातर्फे / महाराष्ट्र बांबू विकास मंडळा मार्फत प्रदान करण्यात येईल. उर्वरीत 50 टक्के रक्कम शेतक-याने स्वत: खर्च करावयाची आहे. जास्तीत जास्त शेतक-यांना या योजनेत सामावून घेण्याचे दृष्टीने या योजनेतंर्गत शासन अनुदान जास्तीत जास्त 2 हे. क्षेत्राकरीता देण्यात येईल.
   ii) खालील प्रपत्रात दिल्यानुसार टिश्यू कल्चर बांबू प्रजातीची रोपे उपलब्ध आहेत व त्याचे दर महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने मंजूर केलेले आहेत.

1) **टिश्यू कल्चर बांबू रोपांची व्दितीय हार्डनिंग केलेल्या रोपांचे मंजूर दर**

| अ.क्र. | टिश्यू कल्चर बांबू प्रजातीचे नांव | मंजूर दर |
|---|---|---|
| १ | मानवेल (Dendrocalamus Strictus) | ३५/- |
| २ | कटांग (Bambusa Bambusa) | ३५/- |
| ३ | माणगा (Oxytenenthara stocksii) | ३५/- |
| ४ | बालकोवा (Bambusa balcooa) | ३०/- |
| ५ | ब्रॉन्डीसी (Dendrocalamus brandissi) | ३५/- |
| ६ | न्यूटन्स (Bambusa Nutans) | ३५/- |
| ७ | ॲस्पर (Dendrocalamus asper) | २५/- |
| 8 | टूल्डा (Bambusa Tulda) | ३५/- |
| ९ | लॉंजीसपॅथीस (Dendrocalamus longispathes) | ३५/- |

2) **पूरवठादार – खालीलपैकी कोणत्याही पूरवठादाराचे रोपवाटीकेतून टिश्यू कल्चर बांबू रोपांची व्दितीय हार्डनिंग केलेल्या रोपांची खरेदी करता येईल.**

| अ.क्र. | पूरवठादाराचे नाव | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | Reva Flora Culture, Borlay infront of Saket Ginng Distt. Barwai | 9425087949 |
| २ | Growmore Biotech Ltd, 41-B, Hosur 635Krishnagiri Dist TamilNadu | 9443000003 |

| | | |
|---|---|---|
| ३ | Ishved Biotech Private Limited, Viman Nagar, Pune. | 8551954777 |
| ४ | Kala Genset Pvt Ltd, Vitthal Mandir Akurdi, Pune | 9545556103 |
| ५ | H U Gugle Biotech Pvt Ltd., Devanahalli Taluka, Vengaluru Rural Dist. | 9448009717 |
| ६ | Devleela Biotechs, Opp Urja Park Vip Road, Gram Dhrampura, Raipur (C.G.) | 9009807000 |
| ७ | Shri Mukund Biotech, Village and Post Majitha near Bhedaghat Railway Station Udna Road Block Shahpura, Jabalpur-482003 | 9300067533 |

iii) 50 टक्के अनुदान (Subsidy) प्रपत्र 1 व 2 मध्ये दिलेल्या अंदाजपत्रकानुसार शेतक-याचे बँक खात्यात सरळरित्या जमा करण्यात येईल.

iv) या योजनेतंर्गत देण्यात येणारे अनुदानाची (Subsidy) रक्कम कोणत्याही परिस्थितीत **रु.** 120/- प्रति रोप पेक्षा जास्त असणार नाही.

v) अनुदानाचे रक्कमेचे प्रदान खालील प्रमाणे तीन भागात केले जाईल. (प्रति रोप)

| | |
|---|---|
| प्रथम वर्ष :- | एकूण अनुदानाच्या 50 टक्के (दोन हप्त्यात) प्रथम हप्ता बांबू लागवड पूर्ण झाल्यानंतर देय रक्कमेच्या 50 टक्के व व्दितीय हप्ता उर्वरीत देय रक्कमेच्या 50 टक्के मार्च महिण्यात 100 टक्के रोपे जिवंत असल्याची खात्री झाल्यानंतर. (रु. ३० + रु. ३० = रु.६०/- एकूण) |
| व्दितीय वर्ष :- | एकूण अनुदानाच्या 30 टक्के एकाच हप्त्यात वित्तीय वर्षाचे शेवटी कमीत कमी 80 टक्के रोपे जिवंत असल्यावर. जिवंत रोपांच्या टक्केवारीच्या प्रमाणातच अनुदान देण्यात येईल. (रु.३६/- एकूण) |
| तृतीय वर्ष :- | 20 टक्के एकाच हप्त्यात एकाच हप्त्यात वित्तीय वर्षाचे शेवटी कमीत कमी 80 टक्के रोपे जिवंत असल्यावर. जिवंत रोपांच्या टक्केवारीच्या प्रमाणातच अनुदान देण्यात येईल. (रु. २४/- एकूण) |

2. वरील अनुदानाची रक्कम स्थानिक वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) व वृत्त समन्वयक महाराष्ट्र बांबू विकास मंडळ यांनी क्षेत्रीय तपासणी करुन दिलेल्या प्रमाणपत्राचे आधारावर करण्यात येईल. प्रथम वर्षातील व्दितीय हप्ता व व्दितीय व तृतीय वर्षातील अनुदान फेब्रुवारी / मार्च महिण्यातील जिवंत रोपांचे टक्केवारीचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच करण्यात येईल.

3. शेतकरी आपल्या शेती मध्ये गट रोपवन किंवा धु-यावर रोपवन करण्यास स्वतंत्र असतील. त्याव्यतिरिक्त ते आपले इच्छेनुसार बांबू प्रजाती लावण्यास स्वतंत्र असतील. प्रजातीची निवड करण्यास महाराष्ट्र बांबू विकास मंडळ मार्गदर्शन देईल. बांबू रोपे महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने तयार केलेल्या पॅनल मधील पुरवठा धारकांकडून मंजुर दराने विकत घेणे बंधनकारक असेल. रोपे खरेदी शेतक-याला करावी लागेल. टिश्यूकल्चर रोपे तथा रोपवन कामासाठी लागणारी इतर साधने शेतक-यांनाच घ्यावी लागतील व त्याचे पेमेंट त्यांनाच करावे लागेल.

4. **रोपवन योजना खालील प्रमाणे :-**

a) गट रोपवन:- टिश्यू कल्चर रोपे 5 मी. x 5 मी. वर प्रति हेक्टरी 400 रोपे लावावीत. शेतक-याला इतर कोणतेही आंतर पीक घेण्याची मुभा असेल.

b) **बांधावरील लागवड** :- शेतक-याला जागेच्या उपलब्धते नुसार शेताचे बांधावर 5 x 5 मी. अंतरावर दोन ओळीत रोपे लावता येईल.

या योजनेतंर्गत बांबू लावण्यास इच्छूक शेतक-यांची निवड वर्तमान् पत्रातून राज्यभर व्यापक प्रसिध्दी देऊन करण्यात येईल. शेतक-यांना प्रपत्र -३ मध्ये अर्ज भरुन स्थानीक वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालयात देणे आवश्यक राहील. त्यावरुन उपलब्ध अंदापत्रकीय तरतूदीनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल. त्यात अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती तसेच महिला शेतक-यांना प्राधान्य देण्यात येईल. बांबू गट शेतीस (Bamboo cluster) प्राधान्य देण्यात येईल.

c) वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) व वृत्तसमन्वयक महाराष्ट्र बांबू विकास मंडळ हे रोपवन क्षेत्रातील कामाचे निरीक्षण करुन त्यात झालेल्या कामाची सत्यता पडताळून प्रमाणीत करतील व तसा अहवाल व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांना सादर करतील.

निवड केलेले लाभार्थी प्रत्येक वर्षी डिसेंबर व जून महिण्यात प्रपत्र 4 किंवा 5 मध्ये प्रगती अहवाल सादर करतील. त्यावर वन परीक्षेत्र अधिकारी (प्रा.) व वृत्तसमन्वयक महाराष्ट्र बांबू विकास मंडळ हे प्रमाणीत करतील. सोबत रोपवन क्षेत्राचे जिओ टॅग (Geotag) फोटो सुध्दा पाठविणे आवश्यक राहील.

d) इच्छूक लाभार्थ्यांना बांबू शेती विषयी माहिती देण्यात येईल. तसेच शक्य झाल्यास यशस्वी रोपवनाला भेटीचा कार्यक्रम आयोजीत करण्यात येईल. त्यात बांबू प्रजाती व त्यांचे गुणधर्म इत्यादी माहिती सुध्दा देण्यात येईल.

e) रोपवनास कुंपण करुन पाणी पूरवठा व्यवस्था शेतक-यास करावी लागेल.

f) अनुदानाच्या रक्कमेची मोजणी **रु.** 240 प्रति रोप या किमतीचे आधारावर काढण्यात येईल.

g) अटल बांबू समृध्दी योजना किंवा राष्ट्रीय बांबू मिशन व्दारा निर्गमीत केलेली योजना यापैकी कोणत्याही एका योजनेमध्ये शेतक-यांना एका वेळी सहभागी होता येईल.

**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर**

## राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतक-यांकरीता रोपवनाचे अंदाजपत्रक

### प्रपत्र - १

### बांबू गटरोपवनाचे अंदाजपत्रक (५ x ५ मी अंतरावर)
### प्रति हेक्टरी ४०० रोपे + ४० रोपे (मरअळी)

| अ.क्र | कामाचे विवरण | परिमाण | प्रति दर | संख्या/हेक्टरी | एकूण खर्च प्रति हेक्टर | शेतक-याने केलेल्या कामाचे परिमाण (हेक्टर) | शेतक-याने केलेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रथम वर्ष** | | | | | | | |
| १ | रोपांची सरासरी खरेदी किंमत (वाहतूक व मरअळीसह) | प्रति रोपे | ३३/- (सरासरी) | ४४० | १४५२०/- | | |
| २ | खड्डे खोदणे (४५ x ४५ x ४५ से.मि.) | प्रति खड्डा | १५/- | ४०० | ६०००/- | | |
| ३ | खड्डे चांगल्या मातीने भरणे | प्रति खड्डा | ५.२० | ४०० | २०८०/- | | |
| ४ | रोपे लागवड करणे | प्रति रोप | ६/- | ४०० | २४००/- | | |
| ५ | ३ वेळा निदंणी करणे व २ वेळा भर भांगलन खत देणे (खताचे खर्चासह) | प्रति रोप | २०/- | ४०० | ८०००/- | | |
| ६ | आवश्यकतेनुसार ५ महीने पाणि देणे | प्रति रोप | २५/- | ४०० | १००००/- | | |
| ७ | कुंपण व संरक्षण कामे ९ महीने साठी | प्रति माह | १०००/- | ९ महीने | ९०००/- | | |
| | | **प्रथम वर्षीय एकूण खर्च** | | | **५२०००/-** | | |
| | **प्रथम वर्षात देण्यात येणारे अनुदान रू. ६०/- प्रति रोप प्रमाणे (३० + ३०) २ हप्त्यात** | | | | **२४०००/-** | | |
| | **शेतक-याला येणारा खर्च/हेक्टर** | | | | **२८०००/-** | | |
| **व्दितीय वर्ष** | | | | | | | |
| १ | २ निंदणी, १ भरभांगलन व खत देणे | प्रति रोप | १५/- | ४०० | ६०००/- | | |
| २ | आवश्यकतेनुसार पाणि देणे | प्रति रोप | १५/- | ४०० | ६०००/- | | |
| ३ | संरक्षण कामे | प्रति माह | १०००/- | १२ महीने | १२००० | | |
| | **व्दितीय वर्षीय एकूण खर्च** | | | | **२४०००/-** | | |
| | **व्दितीय वर्षात देण्यात येणारे अनुदान रू. ३६/- प्रति रोप प्रमाणे** | | | | **१४४००/-** | | |
| | **शेतक-याला येणारा खर्च/ हेक्टर** | | | | **९६००/-** | | |
| **तृतीय वर्ष** | | | | | | | |
| १ | १ निंदणी, भरभांगलन व खत देणे | प्रति रोप | १०/- | ४०० | ४०००/- | | |
| २ | आवश्यकतेनुसार पाणि देणे | प्रति रोप | १०/- | ४०० | ४०००/- | | |
| ३ | संरक्षण कामे | प्रति माह | १०००/- | १२ महीने | १२०००/- | | |
| | **तृतीय वर्षीय एकूण खर्च** | | | | **२००००/-** | | |
| | **तृतीय वर्षात देण्यात येणारे अनुदान रू. २४/- प्रति रोप प्रमाणे** | | | | **९६००/-** | | |
| | **शेतक-याला येणारा खर्च/ हेक्टर** | | | | **१०४००/-** | | |
| | **१ हेक्टर करीता एकूण खर्च** | | | | **९६०००/-** | | |
| | **शासन अनुदान ४०० रोपाकरीता प्रति रोप रू. १२०/- प्रमाणे** | | | | **४८०००/-** | | |
| | **शेतक-याला येणारा खर्च/ हेक्टर** | | | | **४८०००/-** | | |
| | **३ वर्षाकरीता येणारा प्रति रोप एकूण खर्च** | | | | **२४०/-** | | |
| | **३ वर्षाकरीता शेतक-याला देण्यात येणारे प्रति रोप अनुदान** | | | | **१२०/-** | | |

## राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतक-यांकरीता रोपवनाचे अंदाजपत्रक

**प्रपत्र - २**

**बांबू शेतीचे अंदाजपत्रक (शेतीचे बांधावर लावणे करीता ५ x ५ मि. अंतरावर दोन ओळीत)**
**प्रति रोप अंदाजपत्रक**

| **प्रथम वर्ष** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **कामाचे विवरण** | **परिमाण** | **प्रति दर** | **संख्या/हेक्टरी** | **एकूण खर्च प्रति हेक्टर** | **शेतक-याने केलेल्या कामाचे परिमाण** | **शेतक-याने केलेला खर्च** |
| १ | रोपाची सरासरी खरेदी किंमत (वाहतूक व मरळीसह) (रू. ३३/- सरासरी प्रति रोप ) | प्रति रोप | - | १ | ३६.०० | | |
| २ | खड्डे खोदणे | प्रति रोप | १५/- | १ | १५.०० | | |
| ३ | खड्डे चांगल्या मातीने भरणे | प्रति रोप | ५/- | १ | ५.०० | | |
| ४ | रोपे लागवड | प्रति रोप | ६/- | १ | ६.०० | | |
| ५ | ३ वेळा निंदणी व २ वेळा भरभांगलन व खत देणे (खताचे खर्चासह) | प्रति रोप | २०/- | १ | २०.०० | | |
| ६ | आवश्यकतेनुसार रोपांना पाणि देणे | प्रति रोप | २५/- | १ | २५.०० | | |
| ७ | संरक्षण कामे | प्रति रोप | २५/- | १ | २५.०० | | |
| | **प्रथम वर्षीय एकूण खर्च** | | | | **१३२.००** | | |
| | **प्रथम वर्षात देण्यात येणारे अनुदान रू. ६०/- प्रति रोप प्रमाणे (३० + ३०) २ हप्त्यात** | | | | **६०.००** | | |
| | **शेतक-याला येणारा खर्च/ रोप** | | | | **७२.००** | | |
| **व्दितीय वर्ष** | | | | | | | |
| १ | २ निंदणी व १ भरभांगलन व खत देणे | प्रति रोप | १० | १ | १०.०० | | |
| २ | पाणि देणे | प्रति रोप | १५/- | १ | १५.०० | | |
| ३ | संरक्षण कामे | प्रति रोप | ३०/- | १ | ३०.०० | | |
| | **व्दितीय वर्षीय एकूण खर्च** | | | | **५५.००** | | |
| | **व्दितीय वर्षात देण्यात येणारे अनुदान रू. ३६/- प्रति रोप प्रमाणे** | | | | **३६.००** | | |
| | **शेतक-याला येणारा खर्च/रोप** | | | | **१९.००** | | |
| **तृतीय वर्ष** | | | | | | | |
| १ | २ निंदणी व १ भरभांगलण व खत देणे | प्रति रोप | १०/- | १ | १०.०० | | |
| २ | पाणि देणे | प्रति रोप | १३/- | १ | १३.०० | | |
| ३ | संरक्षण कामे | प्रति रोप | ३०/- | १ | ३०.०० | | |
| | **तृतीय वर्षीय एकूण खर्च** | | | | **५३.००** | | |
| | **तृतीय वर्षात देण्यात येणारे अनुदान रू. २४/- प्रति रोप प्रमाणे** | | | | **२४.००** | | |
| | **शेतक-याला येणारा खर्च/रोप** | | | | **२९.००** | | |
| | **३ वर्षाकरीता येणारा प्रति रोप एकूण खर्च** | | | | **२४०.००** | | |
| | **३ वर्षाकरीता शेतक-याला देण्यात येणारे प्रति रोप अनुदान** | | | | **१२०.००** | | |
| | **३ वर्षाकरीता शेतक-याला येणारा खर्च/ रोप** | | | | **१२०.००** | | |